Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

**परिपत्रक**

**तातडीचे**

**विषय:— शासनाच्या महाडीबीटी पोर्टल वरून सन २०२२—२०२३ या वर्षातील शिष्यवृत्ती ऑनलाईन फॉर्म भरतांना येणा—या अडचणी संदर्भातील कार्यशाळेस उपस्थिती बाबत.**

उपरोक्त विषय संदर्भानुसार सर्व अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठ विविध अधिविभागाकडील सर्व नियमित पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांस प्रवेश घेतलेल्या व शासनाकडून दिल्या जाणा—या विविध शिष्यवृत्ती, शुल्क सवलतीकरीता सन २०२२—२०२३ या शैक्षणिक वर्षात ऑनलाईन अर्ज भरताना येणा—या अडचणींच्या अनुषंगाने विद्यार्थी/विद्यार्थीनींना मार्गदर्शनासाठी शुक्रवार दि. ०४/११/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता विद्यापीठातील वि.स.खांडेकर भाषाभवन येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली आहे.

सदर कार्यशाळेमध्ये मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, शिक्षण संचालनालय, पुणे, मा. विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर व मा. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, कोल्हापूर या कार्यालयाचे प्रतिनिधी मार्गदर्शन करणार आहेत.

तेव्हा आपण आपल्या अधिविभागात प्रवेशीत व पात्र विद्यार्थी/विद्यार्थीनींना विविध शिष्यवृत्ती आणि शुल्क सवलतीकरीता ऑनलाईन अर्ज भरतांना येणा—या अडचणी संदर्भातील मार्गदर्शन कार्यशाळेस उपस्थित राहण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच संबधीत लेखनिक यांनाही उपस्थित राहण्याबाबत सूचना देण्यात यावी.

पदव्युत्तर प्रवेश विभाग/आरएडी/पी.जी.प्रवेश-746
दि. 31 OCT 2022

प्र.कुलसचिव

प्रति,

१.सर्व अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक, पदवी व पदव्युत्तर अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
२.मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, शिक्षण संचालनालय, पुणे,
३.मा.विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
४.मा.सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण कार्यालय, कोल्हापूर.
५. नोडल ऑफिसर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

(टिप:— सदरचे परिपत्रक आपल्या अधिविभागातील विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून त्याची प्रत अधिविभागाकडील नोटीस बोर्डवर लावण्यात यावी.)